**माहितीचा अधिकार**

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : ४२/२०२२

**तक्रारकर्ता, श्री. प्रकाश सोमाजी नाकतोडे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यकारी अभियंता,**
गोसी (खुर्द) डावा कालवा क्र.४, चकारा, पवनी ता. पवनी जि. भंडारा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
गोसी (खुर्द) डावा कालवा विभाग, वाही ता. पवनी जि. भंडारा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १८.१०.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | अनुपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| २५.१०.२०२१ | --- | २४.०३.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २८७६/२०१९ मध्ये दिनांक २५.१०.२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १८.१०.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, गोसीखुर्द डावा, कालवा उपविभाग क्र.४, चकारा ता. पवनी जि. भंडारा, श्री. राजेश मारोतराव धोटे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गोसी (खुर्द) डावा कालवा विभाग, वाही (पवनी) जि. भंडारा अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २८७६/२०१९ मध्ये दिनांक २५.१०.२०२१ रोजी सुनावणी घेवून " अपीलार्थी यांच्या माहिती अर्जातील विषयाच्या संदर्भात तहसिलदार, पवनी यांनी जी

टिपणी केलेली असेल त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांली अपिलार्थीस सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्ज ४५ दिवसात सुनावणी घेवून निकाली काढणे अपेक्षित होते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेवून आदेश पारित केलेला नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग झालेला आहे सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.के.मा.अर्ज-२००७/७४/प्रक्र.१५४/०७/०६, दिनांक ३१.०३.२००८ व दि. १०.०६.२००८ च्या परिपत्रकानुसार प्रथम अपिलीय अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतात. तरीही, प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, यापुढे प्राप्त प्रथम अपील अर्जावर विहीत मुदतीत सुनावणी घेवून आदेश पारित करणे अपेक्षित आहे. तरी यापुढे प्रथम अपील अर्जावार विहीत मुदतीत कार्यवाही करुन आदेश पारित करण्याबाबत गांर्भीयाने दखल घ्यावी. या आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २४.०३.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. २८७६/२०१९ मध्ये दिनांक २५.१०.२०२१ रोजी पारित आदेशानुसार प्रदान केलेली माहिती चूकीची असून जनमाहिती अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करून तक्रार दाखल केली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, गोसीखुर्द डावा, कालवा उपविभाग क्र.४, चकारा ता. पवनी जि. भंडारा यांनी दि. ०१.०८.२०१९ रोजी माहिती पुरविली आहे. तहसिलदार पवनी, यांनी जी टिपणी केलेली असेल त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी, असे आदेशित केले. त्यानुषंगाने सहायक कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द डावा, कालवा उपविभाग क्र.४, यांनी अपिलार्थी यांना दि. १०.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला असून कलम २ च प्रमाणे त्यांना माहिती प्रदान केली. त्याची प्रतिलिपी आयोगास सादर केली आहे. त्यानुषंगाने सहायक जनमाहिती अधिकारी यांनी दि. १९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर केला आहे. आदेशात नमूद केल्याप्रमाणे पारित आदेशाचे अनुपालन झाले असल्याने, प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १८.१०.२०२३**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते ★नागपूर★

जा.क्र. 7296 दि.

29 DEC 2023